लोकमत



जनजागृती करताना विद्यार्थीनी, उपस्थित नागेश तलारी, वैशाली धारस्कर व अन्य.

# भंडारा येथे सायबर सुरक्षा जनजागृती

**भंडारा :** क्विक हिल फाउंडेशनच्या सहकार्याने सुरू झालेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमांतर्गत भंडारा टाकळी येथील महिला समाज विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना जे. एम. पटेल कॉलेज भंडारा येथील संगणकशास्त्र विभागाच्या खुशबू गोमासे व अंजू नागोसे या विद्यार्थिनींनी सायबर सुरक्षेविषयी मार्गदर्शन करत सायबर सुरक्षेची गरज अधोरेखित केली. मोबाइलचा वापर करत असताना इंटरनेट व सायबर सुरक्षित व सतर्क राहणे गरजेचे असते, हेदेखील त्यांनी उदहारणासह पटवून दिले. याप्रसंगी क्विक हिल फाउंडेशनचे नागेश तलारी व संगणकशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रवीण घोसेकर, मुख्याध्यापिका वैशाली धरसकर, अनुपमा काटकर व अजय शिर्के उपस्थित होते.

Hello Bhandara
Page No. 2 Sep 06, 2025
Powered by: erelego.com